# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

जा.क्र.मप्रनि/आस्था/ब- १८०
कल्पतरु पॉईट, २ रा मजला,
सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),
मुंबई- ४०० ०२२
दिनांक: २० / ०१/२०१४

**कार्यालयीन आदेश क्रमांक ई- १० /२०१४**

विषय: मंडळातील संमतीपत्र मुल्यांकन कक्षातील CC/CAC च्या बैठकीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या तांत्रिक सदस्यांना मानधन देण्याबाबत

संदर्भ: सहायक सचिव (तांत्रिक) यांची दि.१२/६/१३ ची टिप्पणी

मंडळाच्या संमतीपत्र समिती/संमतीपत्र मुल्यांकन समितीपुढे सादर करण्यात येणाऱ्या संमतीपत्र विषयक प्रकरणांचे कामकाजाचे तांत्रिक बाबीविषयक तज्ज्ञ व्यक्तींकडून छाननी करुन घेण्यासाठी NEERI/ IIT, Mumbai या संस्थांमार्फत दोन तज्ज्ञ सदस्य घेण्याबाबतचा प्रस्ताव सहायक सचिव (तांत्रिक) यांच्याकडून सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर विचार करुन मंडळाच्या संमतीपत्र समिती/संमतीपत्र मुल्यांकन समिती/ तांत्रिक मुल्यांकन समितीवर दोन तज्ज्ञ सदस्यांच्या नेमणूकीस मान्यता देण्यात येत आहे. सदर नेमणूक केलेल्या सदस्यांना खालीलप्रमाणे मानधन व प्रवासभत्ता या आदेशाद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **मानधन व प्रवासभत्त्याची मंजूर रक्कम (प्रती बैठक)** | |
|---|---|---|---|
| १ | तांत्रिक तज्ज्ञ सदस्य | रु. ३,५००/- (मानधन)<br><br>रु. १५००/- ( प्रवासभत्ता) | परंतु प्रतिमाह मानधन व प्रवासभत्त्यासह एकूण अनुज्ञेय रक्कम रु. ५०,०००/- पर्यंत मर्यादीत |

सदर संमतीपत्र समिती/संमतीपत्र मुल्यांकन समितीच्या बैठकीसाठी होणारा खर्च सहायक सचिव (तांत्रिक) यांच्या अग्रधनातून करण्यात यावा.

सदर आदेश माहे मे-२०१३ पासून १ वर्षासाठी अंमलात येत आहेत.

( राजीव कुमार मित्तल,भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी सविनय सादर- मा. अध्यक्ष, म. प्र. नि. मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
सहायक सचिव (तांत्रिक), म.प्र.नि.मंडळ, मुंबई
प्रत माहितीसाठी-
प्रधान वैज्ञानिक अधिकारी/हवा प्रदूषण निवारण अभियंता/जल प्रदूषण निवारण अभियंता/
वरिष्ठ विधी अधिकारी/मुख्य लेखा अधिकारी/प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय